A essay to those natives of Maharashtra who are engaged in the service of the State.



महाराष्ट्र देशांतील कामदारांशीं संभाषण.



पुणें येथें ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें.



इसवी सन १८७३

शके १७९५

आवृत्ति तिसरी

किंमत आणे

ह्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति लवकर विकली गेली. त्या-वरून तिची योग्यता व लोकांची परीक्षा सहज लक्ष्यांत येऊं. व आणखी गिराइकें आलीं, सबब पहिले पेक्षां ग्रंथ सुधारून ही तिसरी आवृत्ति छापिली.

ह्या ग्रंथा विषयीं चांगले पणा-चे दाखले.

तारीख १६ जुलई सन १८४०, चे ज्ञानोदय पत्रांत लिहिलें आहे कीं,—

"हें पुस्तक पुण्यांतील ज्ञानप्रकाश छापखान्यांत छापिलें त्यांत कामदारांनीं लांच न घ्यावा, त्या विषयीं फार चांगला बोध केला आहे; आणि अशा करण्यानें सरकारावर व लोकांवर मोठे उपकार आहेत. लांच घेणें हा मोठा दोष आहे, आणि त्याच्या योगानें लोकांत मोठे अनर्थ घडले आहेत. तरी कामदार लोक निमित्तें सांगतात. व रयतेला ही पाप थोडें दिसतें. त्या विषयीं विस्तारें करून लिहून तें पाप उघड करणें जरूर आहे."

" ईश्वर झाडा घेईल. त्या पासून कांहीं अदृश्य नाहीं. तो लांच घेणाऱ्यांस शिक्षा देईल. इत्यादि बोध त्या ग्रंथांत वारंवार केला आहे."

" हा बोध भारी वजनदार व ठसण्या जोगा आहे; आणि कामदार लोक त्या विषयीं विचार करून सावध होतील तर फार बरें. तसेच जे अधर्मी साहेब लोक आहेत, तेही हें वाचून डोळे उघडतील."

" हें पुस्तक सरकारानें घेऊन सर्व आपले कामदारांस दिल्हें असतां कदाचित् त्यांतील कितीएक हा बोध वाचून लांच खाणें सोडतील."

एका सुज्ञ नेटीव गृहस्थाचा अभिप्राय.

" हें पुस्तक बहुत सुंदर आहे. येणें करून लोकांस फार लाभ आहेत. असे आमचे लोकांत बोध करणार थोडे आहेत. परंतु ईश्वर कृपेनें वृद्धि पावोत."

मुकाम बेळगांव.

महाराष्ट्र देशांतील कामदारांशीं संभाषण.

अहो कामदार लोकानों! तुम्हां सर्वांचे हिताकरितां मी भाषण करितों, हें तुम्हीं चित्त लावून ऐकावें:-

महाराज, तुम्हीं कामामुळें आमचे लोकांमध्यें वजनदार आहां, म्हणून तुमची सुधारणा झाली असतां तुमचे हातून किती एक गोष्टी स्वदेश हिताच्या होतील. परंतु तुम्हां पैकीं किती एक टपके घेऊन बरतर्फ होतात, याचा मला फार खेद वाटतो, म्हणून मीं अगत्य वादानें व अकृत्रिमपणानें तुह्मास उपदेश करितों; हा तुह्मीं सर्वांनीं मनांत वागवावा, अशी माझी विनंती आहे.

तुह्मांपैकीं ज्यांचा बदलौकीक होतो तो बहुतकरून लांच खाण्यामुळें होतो. ह्याजकरितां मी याच विषयापासून तुम्हांशीं बोलण्याचा क्रम आरंभितों.

प्रथम तुह्मीं असें समजा, कीं लांच खाणें आणि चोरी करणें हीं कर्मे समान आहेत. चोरी वाईट हें तुह्मां सर्वांस समजतें; परंतु लांचास चोरीच्या इतकें दूषण त्या देशांतील लोक अद्यापि देत नाहींत. कारण कीं, ल्यांच

खाण्याची चाल मासुल पासून हिकडे चालत आली आहे. त्याजकरितां हिचा विधि अथवा निषेध कोणास ठाऊक नाहीं. तथापि मी जें म्हणतों त्या विषयीं तुमची आतां खात्री करितो.

ज्या पदार्थावर दुसऱ्याचे हक्क आहेत, ते पदार्थ आपण गुमपणानें किंवा जबरीनें बळकावणें यास चोरी म्हणतात. चोरास अधिकाराचें किंवा कामाचें बळ नसतें; म्हणून तो छपून आंगबळानें किंवा शस्त्राचे सहाय्यानें लोकांचे घरांतील जिन्नस उचलतो. आणि लांच घेणाराही तुम्हीं कमी समजूं नका. त्याचें ही कर्म नसेंच आहे. त्याचे हातीं अधिकार असतो, तेंच त्याचें शस्त्र, आणि तेंच त्याचें बळ आहे. तेणेंकरून दुसऱ्यानें श्रमसायासानें किंवा हक्कानें संपादिलेलें द्रव्य तो हरण करितो. त्याचे हक्क दुसऱ्याच्या मिळकतीवर नाहींत. तरी तो अमलाचे बळानें, "नाश करीन" असें भय दाखवून दुसऱ्यास आपली मिळकत दुःखें करून देण्यास आवश्यकता प्राप्त करितो. आणि त्या मिळकतीचा उपभोग शास्त्र, न्याय व मालकाची इच्छा यां व्यतिरिक्त करितो. तेव्हां लांच खाणाऱ्यास आणि चोरास काय अंतर?

तुम्हांस मी आणखी सांगतों, कीं लांच खाणें चोरी पेक्षां ही नीच आहे. कारण कीं, चोरास उगीच सांगावयास तरी कांहीं निमित्त असतें; व त्यास कदाचित् दरिद्रामुळें गरज पडते, व आणखी चोरी करणार नाहीं म्हणून चोराचा पूर्वी करार कोणीं घेतला नसतो. परंतु लांच खाणाऱ्यास किंचित् निमित्त देखील सांगावयास नाहीं. अधिकाऱ्या शिवाय लांच कोणीं कोणास देत नाहीं. तर अधिकारी ह्मणजे काय, तें ऐका:-

रयतेनें आपल्या सुखा करितां व संरक्षणा करितां जें सरकार कबुल केलें, त्या सरकाराचीं अंगें तुह्मी आहां. तुम्हांस रयतेचा लहान मोठा कारभार करण्यास वेतन देऊन मुकरर केलें आहे. जर रयत लोक आपसांत तंटा बखेडा करणार नाहींत, तर अधिकारी यांची गरज नाहीं, हें उघड आहे. परंतु लोक अधिकाऱ्या वांचून नीट नांदत नाहींत, व संरक्षिले जात नाहींत; या जकरितां लोक भाकरी खातात. आणि तांदूळ, गहूं हे तुमचे हवालीं करितात. तुम्हीं नागर न धरितां, पावसांत न जातां, व शेतांत न खपतां, आपले घरीं चैन करिता; ती कशावर? रयतेच्या

मेहनतीचे वेतनावर आहे कीं नाहीं? तेव्हां तुम्हांस रयतेच्या मेहेनतीचा उत्तमांश सरकारानें दिला आहे. हा कशा करितां कीं, तुम्हांकडे हजारों लोकांचीं कामें पडतात; व लबाड लोक फार असतात, ते तुम्हांस अन्याय करण्याकरितां मोठें बक्षीस देण्यास तयार होतील; परंतु तें तुम्हीं घेऊं नये, म्हणून सरकार तुम्हांस मोठ मोठीं वेतनें देऊन खुशाल ठेविते. आणि लोक म्हणतात कीं, "आम्हां पेक्षां त्यांनीं श्रीमंती भोगिली तर पुरवली; पण हे काम निःपक्षपातानें करोत." वास्तवीक पाहिलें तर गरीब लोकांस लंगोटी आणि कोंड्याची भाकर पुरती मिळत नाहीं, आणि तुम्ही उंच उंच वस्त्रें नेसतां. बरें, तुम्हीं कधीं मागावर वस्त्रें स्वहस्तें काढिलीं आहेत? तुम्हीं सोन्याचे दागिने घालतां, बरें, कधीं तुम्ही सोन्याच्या खाणी खणावयास गेलेत आहां? तुम्ही लांकडें जाळतां, बरें, तुम्हीं मोळ्या डोक्यावर कधीं आणल्या आहेत? तुम्हीं सुंदर भाज्या खातां, बरें, तुम्हीं कधीं मळ्याला पाणी घालण्या करितां मोट हांकिली आहां? गरीब लोकांच्या मेहनती पुढें तुमची मेहनत कांहीं नाहीं. तत्रापि तुमच्या घरीं रुपयांच्या

थैल्या, दाण्यांच्या ठिक्या आणि कापडाचे गट्ठे येऊन प-डतात. तेव्हां तुमच्या मनांत असा विवेक यावा, कीं ही संपत्ति आमच्या घरीं कोठून आली? ही कोणीं आ-णिली?

लोक तुम्हांस आपले सुखाचा मोठा हिस्सा अर्प-ण करितात, हा फक्त तुमच्याकडे अधिकार आहे तो नीट चांगले रीतीनें तुम्हीं चालवावा, म्हणून देतात. आ-पण मेहेनत करितों म्हणून सुखास पात्र आहों, असें तुम्हीं समजूं नका. तुमच्या पेक्षां आंग मेहेनत उन्हां-त, थंडींत, करणारे पुष्कळ आहेत; परंतु त्यांस कां-हीं मिळत नाहीं. तुमची बुद्धी सुयंत्र असावी, तुम्हीं काम रीतीनें करावें, लोकांचे कल्याणाचें चिंतन करावें, लोकांचे अबादी करितां श्रम साधारण करावे, तुम्हांस को-णी दुसऱ्याचा घात करण्या करितां द्रव्य दाखवून भुरळे घा-लील, तर तें द्रव्य तुम्हीं स्वीकारूं नये, व तुमच्या कडे मोठीं जबाबदारीचीं कामें आहेत, त्यांत तुम्हीं धर्म उ-ल्लंघन करूं नये, हें तुम्हांस जरूर आहे. कारण कीं, जें तुम्हीं खातां पितां तें सर्व रयतेचे उधार घेतां, त्या-ची फेड काम बरोबर केल्या शिवाय व्हावयाची नाहीं.

त्या प्रमाणें तुम्हीं अधिकारी म्हणजे सर्वांचे कर्जदार आहां.

लांच खाणें हा विश्वास घात आहे- कारण, लोक व सरकार तुम्हांवर असा भरंवसा ठेवितात कीं, तुम्हीं आपलें काम नीट चालवाल; ह्मणून तुम्हांस इतर रयतेहून आबादान ठेवितात; व तुमच्या वर्तणुकेचा प्रतिबंध करण्या करितां तुम्हां पासून शपथा घेतात: व न घेतल्या तरी तुह्मीं काम पतकरलें ह्मणजे शपथे प्रमाणेंच झालें. तुह्मीं कामावर बसलांत ह्मणजे सर्व गरीब व श्रीमंत अशी उमेद बाळगतात कीं, तुह्मीं नीट वागाल. आणि अशा संपूर्ण लोकांच्या भरंवशांत जर तुह्मीं फतरणा कराल, तर मोठा विश्वास घात होईल.

तुह्मीं रयतेचे ऋणी आहांत, त्या करितां त्यांचें कर्ज फेडाल तर चांगलें. गाडीचे ऊरीं फुटलेले घोडे आणि कठा आलेले बैल पाठीवर मार घेत चालतात. ते आणि मोळीवाले, ज्यांच्या डोक्यावर मोळया, पायास नारू सारखा रोग, परंतु तसेच उन्हांत त्रपाक्रांत होऊन चालले असतात. असे जीव जेह्मां मी पाहतों, तेह्मां मला वाटतें कीं, हे आतां असे दिसतात

तात; परंतु हे पूर्वजन्मी मोठे प्रधान, मंत्री, मुनसफ, मुत्सद्दी, राव किंवा पंत होते; परंतु रयतेचें कर्ज त्यानीं नीट फेडलें नाहीं, ह्मणून हे त्या जन्मीं कष्ट भोगी आहेत. त्याकरितां तुम्हीं आपल्या पेक्षां गरीब लोक ह्यांस पाहून सावध व्हा. जर तुह्मीं त्या जन्मी कसर केली; तर पुढें कधींतरी तुह्मांस कोणत्याही तऱ्हेनें फेडलें पाहिजे. ईश्वर तुह्मांस मुफत खाऊं देणार नाहीं.

तुह्मांस वाटत असेल कीं, संसार करणें आणि कामें अधिकाराचीं करणें हें मुळींच पाप आहे; तेव्हां आणखी त्यांत पाप केलें तर चिंता नाहीं. परंतु तसें नाहीं. जर त्याच ठिकाणीं चांगले वागाल तर तुह्मांस सद्गति आहे, व संसारांतच तुह्मांस ब्रह्मचर्य, सन्यास, इत्यादिक पुण्यें समजतात, त्यांचीं फळें मिळतील. पण तुह्मांस सन्मार्गी वागलें पाहिजे. भारतांत दान धर्म सांगितला आहे. व नानाप्रकारचीं दानें सांगून शेवटीं असें तात्पर्य सांगितलें आहे कीं, अभयदान सर्वांहून श्रेष्ठ, आणि सर्व दानांचें पुण्य अभय, दानाचें कोटांशें ही शाशी देखील तुल्य नाहीं. आतां पाहावा, हें अभय दान करण्यास तुह्मीं योग्य आहां. तु-

ह्यांस कोणी विनाकारण भिऊं नये, असें करा. लोकां-
नीं न्यायाला भ्यावें; परंतु अधिकाराला भिऊं नये.

वाईट कर्म बहुधा प्रगट होतें, परंतु न झालें तर
ईश्वर सर्वांचा झाडा घेईल. त्या लोकीं ईश्वर जरी पा-
पिष्टांचें शासन करण्या करितां हमेषा प्रगट होत नाहीं,
तरीं मरणा नंतर न्याय कोणास चुकणार नाहीं. म-
नुष्यानें डोळे चुकवून फळ काय? चुकवाल तर त्या
दोषाचें आणि त्या दोषाचें दुहेरी शासन तुह्मांस परमेश्व-
र करील. त्या करितां ईश्वर भजनाहून कनिष्ट धर्म का-
मदारास प्रजेचे कल्याणा खेरीज दुसरा नाहीं.

जें काम तुम्हीं पतकरलें आहे, त्याची हयगय
करून पूजा अर्चा जरी तुम्हीं पुष्कळ केली, तरी त्यांत
मरणोपाय नाहीं. ईश्वरास संतुष्ट करण्याचें तुमच्या म-
नांत असेल तर त्यानें निर्माण केलेले जीव त्यांस संतुष्ट
करा. पेशव्यांचे न्यायाधीश रामशास्त्री हे माधवराव पे-
शवे त्यांस काय बोलले तें तुह्मांस सांगतों. स्नान
संध्या करीत असून मौन धरून श्रीमंत बसले होते,
हें पाहून रामशास्त्री यास संताप आला; आणि का-
शीस जाण्याचा निरोप मागितला. आणि सांगितलें

कीं;" तुह्मी जरी ब्राह्मण खरे तरी राज्य पतकरलें; आतां स्नान संध्या कमी करावी. तें न करून सर्व कारभार सोडून घरांत बसतां. तस्मात् तुह्मीं अधर्म करितां. आतां तुमच्या राज्यांत राहाण्याची चव नाहीं." तेव्हां श्रीमंतांनीं स्नान संध्येचा संक्षेप केला.

लांच खाणें चोरीहून अधिक आहे. कारण कीं, चोरास कोणी सावध राहून धरील. परंतु लांच घेणारास काय करावें? उघडे दिवसास ही लूट होते, त्यास्तव लोक लाचार होतात.

"आमचा पगार थोडा, कुटुंब मोठें, भाऊबंद, बायका, पोरें, त्यांचा निर्वाह कसा चालतो?" असें जर कोणी ह्मणतील तर तें ठीक नाहीं. कारण कीं, एकादा व्यापारी आहे; (सगळेच कामदार नसतात.) आणि त्यांस खर्चा पुरता नफा न मिळेल. तर त्यानें चोरी करावी कीं काय? नाहीं. त्यास उपाय इतकाच कीं, त्यानें दुसरा उदीम करावा. आपले भाऊबंदांस, मुलांबायकांस, विद्या शिकवून त्याजकडून कांहीं उद्योग करवावा, ह्मणजे आपलें ओझें कमी होईल. विचार कराल तर उद्योग पुष्कळ निघतील; परंतु लबाडीनें चार दिव-

स पोट भरावें, आणि ज्या दिवशीं लबाडी प्रगट होईल, त्या दिवशीं सगळी गेली आणि अर्धी गेली, असें होईल. हा बेषरमपणा चांगला नाहीं.

" आमचे घरीं भट भिक्षुक वगैरे येतात, त्यांस लौकिका प्रमाणें दिलें पाहिजे- त्यास पैका कोठून आणावा.?" असें ह्मणाल तर हें योग्य नाहीं. दान, धर्म ईश्वराच्या येथें मान्य व्हावा, ह्मणून करावयाचा; लौकिका करितां जे करतात, ते केवळ ढोंगी होत, ह्याज करितां शुद्ध द्रव्याचा व्यय थोडा केला तरी श्रेयस्कर आहे. गरीबास दोन पैसे दिले तर धन्य काळ व त्याचें ईश्वर फळ देईल. आणि अन्यायें करून चोरीचें द्रव्य पुष्कळ मिळविलें आणि धर्म केला; तर तो प्रतिबंधास मात्र कारण होईल.

तुह्मी ह्मणाल कीं, " आह्मांस लग्नें मुंजी कर्तव्य आहेत, त्यांस लौकिका प्रमाणें खर्च न करावा, तर सर्व हंसतील. आणि वेतनाची तर कांहीं शिलकराहात नाहीं. तेव्हां आवांतर पैसा मिळविल्या खेरीज कसें चालेल?" तर लग्नें व कार्यें श्रीमंतांचे पाठी मागें सांप्रत काळा प्रमाणें करणें ही मोठी व्याधि आहे. खरी;

परंतु मी तुह्मांस सांगतों, कीं पैसा फार खर्च करण्यांत कांहीं धन्यत्व नाहीं, व तुमचीं मुलें सुखी होतात असें ही नाहीं. ह्या पेक्षां मुलांस विद्या शिकवाल तर बरें होईल. तुमचे आटव्यांत अशीं किती एक मुलें नाहींत, कीं ज्यांचे लग्नांस हजारों रुपये लागले, पण आतां ते चिंध्या लावितात, व मिळविण्याची शक्ती ही नाहीं. हें कशानें झालें? त्यांचे आईबापांनीं विचार केला नाहीं. त्याजकरितां मिळकती अन्वयें खर्च करावा, हेंच चांगलें. डांमडोलांत कांहीं अर्थ नाहीं. तुह्मीं थोडा थोडा पैसा जरी महिन्याचे कांठीं संचय करीत जाल, तरी तुह्मांस ह्मातारपणीं दुःखात न राहून सुखी राहाल.

तुह्मीं ह्मणाल कीं, पैसा खाल्ला तर आमची प्रतिष्ठा वाढते असें मुकरर नाहीं; व न खाल्ला तरी अप्रतिष्ठा होते हें ही मुकरर नाहीं; मग कां न खावा? ह्याचें उत्तर ऐका; पैसा खाल्ला तर तुमची लोकांत फजीती होते. ह्यांत संशय नाहीं. प्रारब्धवशात् लोकांचे मूर्खपणानें सरकारांत कदाचित् न होऊ; पण तुमची प्रतिष्ठा वाढविणें हें तुमचे हातीं आहे.

तुम चांगले लांच न खाणारे यांची इज्जत वाढत नाहीं, असें नाहीं. परंतु जरी तुह्मीं असें ह्मणाल, तरी मी त्या विषयीं समजूत घालतों. सरकार अंतर्यामीचें जाणत नाहीं-तुमच्याच सारखे सरकाराचे डोळे आहेत. तुमच्यांतून एकानें लांच खाल्ली, किंवा गैरचाल केली, ह्मणजे तुह्मां सर्वांस कालिमा लागतें. आणि सर्वांवरचा विश्वास जातो. चांगल्या वाईटाची निवड होत नाहीं. एक गोष्ट अशी आहे कीं, वांईस एक ब्राह्मणाचा मुलगा पाण्यांत पोंहावयास गेला ह्मणजे "बुडालों, बुडालों" ह्मणून ओरडे. एके दिवशीं तो वास्तवीकच बुडूं लागला, तेह्मां ओरडूं लागला; परण कडेवरचे लोक रोजच्या गतीवर गेले; आणि उगेंच राहिले; शेवटीं तो मेला. ह्याचें तात्पर्य असें कीं, नेहेमी तो खोटी गोष्ट बोलत असे, ह्मणून त्याचें खरें ओरडणें ही खोटेंच झालें. आणि कडेवरचे लोकांस त्याचा निर्णय करितां आला नाहीं. हा दोष कोणाचा? विचार करा, तुमचे गुण दोषांचा ईश्वराचे येथें बिनचुक निवाडा होईल. परंतु येथें माणसां मध्यें निवड ह्मावी, अशी जर तुम-

ची

ची इच्छा असेल तर तुह्मां सर्वांस नीट वागलें पाहिजे. ह्मणजे भरंवसा पडून सर्वांची अब्रु वाढेल. ह्या करितां जो तुम्हां मध्यें लाच खाणारा किंवा प्रतरणा करणारा असेल, त्यास तुह्मीं सर्वजण शत्रु समजा. अशा लबाडाचे हातून तुम्हां सर्वांचा नाश होतो. त्या करितां तशा मनुष्यास पहिल्यानें सुधारा, बुद्धिवाद करून पाहा, नच ऐकेतर शेवटचा उपाय, शासन करणें प्राप्त.

तुह्मीं ह्मणाल कीं, "लोकांची घरें बुडवून पैसा मिळविल्या खेरीज श्रीमंत होत नाहीं." तर ही गोष्ट आपल्या लोकांमध्यें खरी आहे; परंतु ही उपयोगीं नाहीं. असे जे श्रीमंत होतात, ते मूर्ख व दुष्ट जाणावे. श्रीमंत होण्याचे मार्ग बहुत आहेत. पहिलें, राज्य वाईट होतें, ह्मणून ते बहुधा वेतन कमी देऊन सर्वांकडून लांच खाववीत. ह्मणून ही समजूत पडली आहे. परंतु व्यापार व रोजगार चांगले रीतीचे व श्रीमंत होण्या जोगे बहुत आहेत; परंतु ते तुह्मांस अश्रुत आहेत. विचार केला तर कळतील.

तुह्मां पैकीं जे इंग्रज सरकारचे पदरीं आहेत,

त्यांजकडे लहान अधिकार आहेत, त्या करितां मोठीं कामें मिळविण्याची तुह्मांस उमेद असावी. इंग्रज सरकारचें राज्य वाढत चाललें आहे, त्याकरितां स्वदेशीय लोकांकडे मोठे अधिकार येतील, तर कल्याण होईल. तुह्मीं मोठीं कामें करण्यास लायक आहां, अशी सर्वांची खात्री करा. अजून तर तुह्मांस कोणी इंग्रजा पेक्षां चांगले कामदार असें ह्मणतांनां मीं कधीं कोणास ऐकिलें नाहीं. त्यामुळें लाभदायक मिळकतीचीं कामें सर्व इंग्रजाकडे राहून तुमचे लोकांचें ऐश्वर्य कधीं वाढणार नाहीं. ह्यास्तव पुढें मोठे आशेवर नजर ठेऊन आपली वर्तणूक सुधारा, म्हणजे तुमचा दावा व हक्क मोठ अम्मलवर होईल. तुह्मीं अशी तजवीज करा कीं, आपण स्वतः व त्या देशांतील सर्व लोक त्यांनीं इंग्रजा सारखे गुणी, विद्वान, माहितगार व लायक व्हावें. तुह्मीं त्या देशाचे लोकांमध्यें पुढारी आहां, ह्मणून हें काम तुह्मीं डोईवर घेतलें असतां होईल; आणि फार आवश्यक ही आहे. आधीं योग्य व्हा, मग मागा, ह्मणजे ईश्वर ही मदत करील.

तुह्मीं ह्मणाल कीं, आजपर्यंत हिकडील लोकांनीं राज्य केलें कीं नाहीं? परंतु आजपर्यंत केलें त्याचें कारण असें आहे कीं, इंग्रजां सारखे शाहाणे लोक हिकडे आले नव्हते ह्मणून केलें. दुष्काळांत कोंडा खातात कीं नाहीं? आजरयतेस इंग्रज जितके मान्य आहेत, तितके तुह्मीं नाहीं. त्याचें कारण ते लोक निर्मळ आहेत, व डौली आणि लोभी नाहींत. त्या गुणांनीं त्याणीं हिकडे सुलभतेनें राज्य मिळविलें. तुह्मीं इतकें करा कीं, आज जिल्ह्याचें ज्यडूज्याचें काम जर तुमच्यांतून कोणाकडे सांगितलें; तर रयत लोक कोणी खुषी होणार नाहींत. कारण कीं, अदालत न्यायाचें घर आहे, तें मोडून तुह्मां मुळें लिलावांचें घर होईल, असें सर्व लोक ह्मणतील कीं नाहीं, त्याचा विचार करा.

तुह्मांस असें वाटेल कीं, मागें नाना फडनविसा सारखे लांच उघड खात होते; परंतु हें कारण योग्य नाहीं. अमक्यानें केलें, ह्मणून मी करितों. असें ह्मणणें हा मूर्खपणा आहे. पूर्वीचे राज्यांत लोकांस खाण्यापिण्याची सोय आतांच्या पेक्षां

बरी होती, ह्मणून त्या राज्यांस चागली ह्मणतात. परंतु तेह्वां शहाणपणा, कायदा, कानू, बंदोबस्त, वगैरे नह्वतीं. . जबरी, मारामारी, लुटालुट, नित्य घडत होती. नाना फडनवीस देखील इंग्रजांचा बंदोबस्त व कायदा चांगला, ह्मणून वर्णन करित होते. चांगले राज्यांत लांच अवश्य बंद झाली पाहिजे. अशी बंदी सर्वत्र चांगले राज्यांत आहे, हें शोधा अंतीं कळेल.

लोकांस सुख व्हावें, ह्मणून सरकार आहे. सरकारानें केल्याविना लोकांस सुख होत नाहीं; व ज्यांचे हातीं कायदा चालवावया करितां दिला आहे, त्यांनीं तो नीट चालविल्या वांचून कायद्याचा उपयोग नाहीं; व कायद्या प्रमाणें वर्तणूक होण्या करितां लांच बंद केल्या शिवाय परिणाम नाहीं. जीं राज्यें आडाणी लोकांचे हातीं असतात. व जीं राज्यें तुकतींच उभीं राहिलीं असतात, त्यांत लोक शाह्मणें व जाणते नसून कायदा कानूचा बंदोबस्त नसतो; परंतु तो कांहीं किता होत नाहीं. ज्यांनीं फार दिवस राज्यें करून विचार फार केला आहे, त्यांचे अनुभवावरू-

न

न समजतें कीं, कायदा जरूर आहे. व जर कायदा राज्यास न-को तर मागें मन्वादिकांनीं धर्म शास्त्रें कशाला लिहिलीं, असतीं. त्याचा विचार करावा.

लांच घेण्यानें अन्याय होतो. कित्ता एकांस असें वाटतें कीं, खन्या तर्फेनें लांच खाल्ला तर दोष नाहीं, परंतु हें बरोबर नाहीं. लांच कोणी संतोषानें देत नाहीं. तुह्मी असा विचार करा, कीं जर तुह्मीं कामावर नसतां तर तुमच्या घरीं कोणी पैसा घेऊन येताकाय? त्याकरितां तुह्माला अधिकारा संबंधें नेमलेल्या वेतना शिवाय जें कांहीं कोणीं देतो, ती सर्व लांच आहे. तुह्मीं अधिकारावर असून तुह्मांस द्यावयाजोगा जो पदार्थ असेल तो मात्र लांच नव्हे.

कित्ता एक लोक कामावर बसले ह्मणजे लांच घेऊं नये, असा प्रथम संकल्प करितात; मग चार लबाड लोक येऊं लागून कोणत्या तरी प्रकारानें फसवितात. मग एकदां संवय लागली म्हणजे सुटत नाहीं; व त्याची दृष्टी जाते.

पैसा मिळूं लागला ह्मणजे खर्च वाढतो; मग अन्यायानें पैका मिळवावा असें वाटतें. परंतु मुळींच

सावधगिरी ठेवावी हें चांगलें. लबाडा जवळ उभें राहूं नये. कारण कीं, द्रव्य मिळविलें तें लोक खाऊन जातात. आणि पाप एकाऱ्या डोकीवर बसतें.

लांच घेणें हें फार हलकें काम आहे. कारण कीं, हें काम जुलमाचें आहे; व गरीब लोकांपासून अमलाच्या बळानें द्रव्य घेणें हें फार नीच कर्म आहे. जो लांच देतो, तो आर्जवानें तोंडावर मात्र बोलतो, परंतु उमऱ्या बाहेर त्याचें पाऊल पडलें, ह्मणजे सर्व गांवांत दांडोरा पिटतो, कारण कीं, ज्याचा गळा धरून पैसा घेतला, त्याचें सुख त्यास वाटत नसतें. अत्यंत गरजे मुळें मात्र तो पैसा देतो.

कितीएक लोक ह्मणतात कीं, "आह्मीं खुषीनें पैसा देतों. ह्या विषयीं तुह्मीं कांहीं मनांत न आणितां घ्या." परंतु हें बोलणें व्यर्थ आहे. चोराच्या हद्दींत जो सांपडतो तो आपले सुटके करितां त्याचें आर्जव करितो. तदनुसार हें आहे.

तुह्मांस वाटत असेल कीं, द्रव्यवान् लोक मूर्ख आहेत, त्यांजपासून यत्किंचित् द्रव्य घेतलें, ह्मणून त्याचें नुकसान विशेष होत नाहीं. तर ह्याचें उत्तर

ऐका; किती ही द्रव्यवान् मनुष्य असला तरी त्यावर कोणा-चा हक्क नाहीं. त्या करितां श्रीमंत लोक मूर्ख असतील तर त्यांस सुधारा; त्यांस वाटेवर आणा. परंतु त्यांच्या मालाचा अभिलाष करूं नका. आणि जों जों श्रीमंतां शीं तुह्मी नि-र्लोभानें वागाल, तों तों तुमचा लौकिक वाढेल.

चांगली कीर्ति लोकांत वास्तवीक मान मान्यतेचें कारण आहे. सत्कीर्तीस कोणी चोरीत नाहीं. ती फा-र दिवस राहाते. व ती परलोकाचें साधन आहे. स-त्कीर्ति तुमची स्वतंत्र संपदा आहे. तिची वांटणी कोणी भाऊबंद घेत नाहींत. तुमच्या नांवाबरोबर ती राहील.

मनुष्यांच्या चुक्या क्षमेस पात्र आहेत; आ-णि समजून अपराध केलेले शासनास पात्र आहे-त. तुमचें अंतःकरण निर्मळ असलें ह्मणजे त्या नि-र्मळपणा खालीं तुमच्या बाहेरल्या खोडी झांकल्या जा-तील.

वाईट काम करणाऱ्याला वास्तवीक पाहिलें त-र सुख ही नाहीं. त्याला दिवसास भय व रात्रीं उ-चका असतो. सकाळीं उठला ह्मणजे त्याला वाट-तें कीं, आज माझी अब्रू कोणी घेईल कीं काय?

हा त्याला निजध्यास असतो. त्याला स्वस्थ झोंप येत नाहीं. ही मनुष्यांमध्यें त्याची अवस्था, मग मरण समयीं त्यास केवढी वाटत असेल! त्याला सुखें करून मरण येणार नाहीं. जों जों त्याला वाटतें, कीं मी ईश्वरापाशीं जाईन, तों तों जसा चोर कोंतवाला कडे जाण्यास भीतो, तशी त्याची अवस्था होते.

चांगले कामदाराच्या दोन गोष्टी तुम्हांस सांगतों; मागें पुण्यांत राम शास्त्री होते, त्यांकडे दक्षणेचा अधिकार होता. त्यांचा एक बंधु मूढ होता, तो दक्षणा घ्यावयास आला, तेव्हां नाना फडनवीस त्यांनीं शास्त्री बावां कडे पाहिलें. कारण कीं, तो त्याचा बंधु तेव्हां त्यांस कमी दक्षिणा देणें अवघड. परंतु शास्त्री बावा महान् न्यायी त्यांनीं लागलेंच सांगितलें कीं, " याची दोन रुपयांची योग्यता आहे. त्यास अधिक देऊं नका." याचें कारण काय? कीं, ज्या नियमा प्रमाणें दक्षणा देण्यास सांगितलें त्याचें उल्लंघन न व्हावें, हा त्यांचा मनोदय. दुसरे; वाशिंग्टन् साहेब अमेरिकेंत मोठा अधिकारी होता. त्याचे हातांत एक जागा द्यावयाची आली; तेव्हां त्याचा परम मित्र एक ग्रहस्थ होता,

त्यानें अर्जी लिहून जागा मागण्या करितां गेला. तों तेथें दुसरे त्याच्याहून अधिक लायकीचे उमेदवार अर्जी घेऊन आले होते; परंतु त्या गृहस्थांचे मनांत असा भरंवसा होता कीं, माझे स्नेहीपणावर काम होईल. परंतु त्या साहेबानें आपले मित्रास सांगितलें कीं, "बाबा, तुझा माझा स्नेह आहे खरा, परंतु मीं आतां अधिकारावर बसलों आहे. त्या समयीं तुझ्या स्नेहाकरितां तुझ्याहून शाहाण्या उमेदवारांची निराशा करावी, हें मला उचित नाहीं; व त्यांत लोकांचें ही नुकसान आहे. ह्याकरितां अमका मनुष्य सर्वांहून शहाणा माझ्या नजरेस येतो, त्यास मी जागा देतों" हें ऐकून हा पुरुष न्यायी आहे, असें समजून तो त्याच्या कीर्तीचें वर्णन करित गेला. त्यानें कांहीं मनांत वाईट आणलें नाहीं.

तुमचा धर्म असा आहे कीं, जीं कामें तुह्माकडे आहेत, तीं निर्मळपणानें करून त्या शिवाय लोकांत ज्ञान वृद्धि वगैरे हित करण्यास झटावें. परंतु हा तुमचा धर्म तुह्मांस कळण्यास तुह्मीं स्वतः प्रथम ज्ञानींव विचारशील झालें पाहिजे, म्हणजे तुमची सांप्रत-

ची अज्ञानदशी जाऊन लोकांस सुख करण्याचा राज-
मार्ग तुह्मांस दृश्य होईल. सांप्रत तुम्हीं स्वतः आ-
डाणी आहां, मग तुह्मांस लोकांचा मूर्खपणा आहे,
अथवा नाहीं, हें कशानें कळेल? व तुह्मांकडून प्र-
यत्न कोठून होणार? व आमचा अभिप्राय तुमच्या
ध्यानांत कसा येईल? आंधळ्यापुढें मशाल असली,
तर उपयोग पडणार नाहीं. तुह्मीं आलस्य वृत्ति सो-
डा. इंग्रजांनीं तुह्मांस जागें केल्या शिवाय तुह्मीं जा-
गे होत नाहीं, हें ठीक नाहीं. हल्लीं इंग्रज लोक तु-
मच्या कडून काम बलात्कारानें करवितात, व का-
यदा बांधवितात. जर तुह्मांकडे सुखच्यारी असेल तर तु-
ह्मीं बाहेर आग लागली, असें कळलें तर जाग्यावरू-
न उठणार नाहीं. त्यास्तव तुह्मीं स्वतः आटोप ध-
रला पाहिजे. काम आणि अधिकार हीं ओझीं आ-
हेत, लाभ नव्हेत. परंतु अकृतज्ञ उलटें समजतात.
आणि सामर्थ्य नसलें तरी काम सोडीत नाहींत. शेवटीं सरका-
रांतून जा ह्मणतात. त्यांत काय शोभा? ह्यास्तव असा दुर्लो-
भ धरूं नये. डोळे, कान, हात, गेले तरी तुमची कामावर
ची आशा राहाते; व भिडेनें व साहेबाच्या कृपेनें काम

लोटितां. जर तुह्मी काम हें श्रमदायक ओझें समजाल, तर हा मूर्खपणा तुह्मी कदापि करणार नाहीं.

लोक सांप्रत राज्या विषयीं फार बोभाटा करितात; न्याय बरोबर होत नाहीं, व अन्याय होऊन लोकांचीं घरें बुडतात; व लोक भिकारी होतात; असे गिल्हे फार आहेत, परंतु त्याचें कारण निमें तुह्मीं आहां. जर तुह्मीं लोकांची काळजी कराल तर बहुतेक अनर्थ चुकतील.

अन्यायानें पैसा मिळविला असतां, त्याचा उपभोग होतो असा नियम नाहीं. मरण आज येईल किंवा उद्यां येईल हें सांगवत नाहीं, परंतु जरी अशास्त्र सुख भोगावयास प्राणी जगला, तरी आयुष्य फार अल्प आहे. तेव्हां त्या अल्प भोगार्थ शाश्वत सुखाची हानि कां करावी? जे पुढला विचार करित नाहींत, त्यांची दशा फार वाईट होते, त्याचा दाखला तुह्मी त्या जाग्यांत घ्या. कितीएक लोक पहिल्यानें श्रीमंत असून सर्व पैसा खर्च करितात आणि वृद्धाप काळीं दुर्दशा भोगितात.

जे ह्या जन्मीं विचार पाहात नाहींत, त्यांची तीच अवस्था आहे.

लांचेच्या दोषाचीं कारणें तीन आहेत. प्रथम लोकांचा मूर्खपणा हेच कामदारास चटक लावितात. ते लांच देणें हा मोठा गुन्हा समजत नाहींत. दुसरें दुराचारी, दुर्जन व मूर्ख कामदार लांच घेतात. तिसरें साहेब लोक वगैरे अज्ञान असतात, त्यांस कोणाला अधिकारावर नेंमावें हें बरोबर कळत नाहीं. व स्वतः कामही करतां येत नाहीं. परंतु त्या तिहीं मध्यें दुसरें कारण तुमच्या ठायीं आहे तें प्रमुख अधिकार प्राप्त होत्सातां जे दुसऱ्यास नेंमितात. ते स्वतः जरी गैरमाहीत असले तरी त्यांचे अज्ञानाचा लाभ मानूं नये. आपण जरी अयोग्य असलों, तरी योग्यता मिळविण्याचा प्रयत्न करावा. दागिन्यांसुद्धां लहान मुलें जर कोणाचे हातीं सांपडलीं, तर त्याच्यानें चोराचा प्रतिकार करवणार नाहीं. आणि जो चोरतो त्या चोराचा दोष इतर चोरांहून अधिक आहे. कारण कीं, त्याणें न जाणत्यास ठकविलें. तद्वत् अडाणी लोकांत अधिकार प्राप्त झाला, तरी त्यांचे कल्याणावर दृष्टी ठेवावी.

वावी. अशक्त व आडाणी म्हणून लुटूं नये. तसेंच यजमान मूर्ख किंवा भरंवसा ठेवणारा असला तर त्यासही फसवूं नये.

त्यांचे विषयीं मी तुह्मांस उष्कळ बोलिलों. त्यावरून तुमचा संदेह [illegible] असेलच; परंतु आणखी ना[illegible]र्याच्या दोन [illegible] सां[illegible], त्याही ऐकून घ्या.

अधिकार आला म्हणून गर्व करूं नये. तुच्छ व आर्जवी लोकांस जवळ [illegible] करूं नये. डौला करितां शिपाई, प्यादे, व [illegible] त्यांस पुढें [illegible] नये. अधिकार नीट चालवि[illegible] जरूर आहेत, तितक्याच माणसांस जवळ ठेवावें. [illegible] जे येतील त्यांशीं आदरें करून [illegible]. अधिकारानें फुगूं नये. तुह्मी रोजगारावर आहां म्हणून उधळेपणा, डामडौल, [illegible]. कारण कीं, रोजगार गेल्यावर [illegible] पडली असेल, ती सोडण्यास [illegible] आणि शिपायाशिवाय फिरण्याची लाज [illegible]. त्याजकरितां सुरवातीस संवय केली नाहीं [illegible] सोडण्याचें व [illegible] दुःख [illegible] कामाबद्दल तु-

ह्मीं पगार खातां, तें काम नीट संभाळून करा. त्यां खेरीज दुसरीं कामें लोकांचे कल्याणा करितां विन् पगारी कोणी तुह्मांस सांगितलीं, तरी तीं हौसेनें करा. केवळ द्रव्य मिळेलतर काम करूं, नाहीं तर जाग्यावरून हालणार नाहीं. असा हलकेपणा व भाडेकरीपणा करूं नका. बरें, तुह्मीं व्यर्थ कामास थोडे फिरतां? तोच वेळ ज्ञान संपादना कडे लावा. वर्तमानपत्रें फार उपयोगीं आहेत, तेणें करून तुह्मांस शहाणपणा येईल, तीं व पुस्तकें चित्त लावून वाचीत जा. विद्येविषयीं आळस नसावा. तुह्मां किती एकांस विद्या येत नाहीं, व विद्येचें लक्षण ही ठाऊक नाहीं, त्यास्तव विद्वान होण्याची इच्छा असूं द्या. मागें लोक अविद्वान असतां श्रीमंत होते, मग आह्मीं विद्या कशास करावी, ही समजूत वेडेपणाची आहे. विद्या द्रव्या करितांच आहे, असें नाहीं. छापखान्याचे लाभ तुह्मांस ठाऊक नाहींत, ह्मणून तुह्मीं त्याची हयगय व हेळणा करितां, हें तर उघड आहे. तुमचे देशांतील लोक अज्ञानी बहुत आहेत, त्यांचा भ्रम जाऊन भानावर येत अशी तजवीज करा. आणि

हें तुह्मीं सर्वांनीं केलें, तर सांप्रत होत आहे, त्या पेक्षां सत्वर होईल. कारण कीं, तुमचें षज्जन लोकां मध्यें आहे, तें व्यर्थ किंवा वाईट कामांत खर्च करूं नका. तुह्मीं मोठाले गोष्टींचा विचार करा. हलकेपणांत व क्षुल्लक गोष्टींत चित्त घालणें सोडून द्या. सारांश, तुह्मीं आहांत त्याहून सुधरून चांगले व शाहाणें व्हावें; तुह्मांस किती एक गोष्टी ठाऊक नाहींत त्या कळाव्या; आणि तुह्मीं ईश्वर निर्मित प्राणी सत्य, दया, न्याय इत्यादि सद्गुणें करून सुशोभाय मान होत्सातां, तुह्मांस मृत्युलोकीं सुख आणि सत्कीर्ति, आणि पश्चात् वैकुंठ प्राप्त व्हावा; अशी माझी पूर्ण आशा आहे. आणि तदनुसार श्रीहरी तुम्हास जन्माचें साफल्य करण्या करितां सद्बुद्धि देवो; ही माझी सप्रेम प्रार्थना आहे.

लोक हित वादी.

विकावयाचे ग्रंथ.

किंमत रुपये.		किंमत रुपये.	
०५	खोटी शपथ वाहूं नये, ह्या विषयीं.	०१०	भरत खंड पर्व.
०६	शब्दालंकार.	१	पंचोपाख्यान.
१	यंत्र ज्ञान.	०४	साहेब लोकांशीं संभाषण.
०५	गुलिस्तांचा ८ भाग.	०२	अंक लिपी.
०१०	मायन्याचें बूक.	०१२	गायन प्रकाश.